**अत्यंत महत्वाचे / ई-मेल द्वारे :**

जा.क्र.जिग्रावियला/इंआयो /प्र.क्र.457/16
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा लातूर
दिनांक- 6 /08/2016

प्रति,

1. तहसीलदार,
   तहसील कार्यालय, - - - - - - - - - - -
2. गट विकास अधिकारी,
   पंचायत समिती, - - - - - - - - - - - - -

विषय : सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण - 2011 मधील आकडेवारीचा वापर प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या लाभार्थी निवडीकरिता ग्रामसभे पुर्वी व ग्रामसभे मध्ये करावयाच्या कार्यवाही बाबत ..

संदर्भ : 1) मा.सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मुंबई यांचे पत्र क्र.प्रमआयो-जी/2016/प्र.क्र.203/ यो-10 दिनांक 01/08/2016
2) संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,सिडको भवन,5 वा मजला,दक्षिण कक्ष, बेलापूर यांचे पत्र दि.03/08/2016

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण - 2011 मधील माहितीच्या आधारे प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण ची प्राधान्यक्रम याद्या तयार करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक, आर्थिक जात सर्वेक्षण 2011 ची माहिती वापरुन प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण योजनेसाठी लाभार्थ्यांची प्राधान्यक्रमानुसार याद्या तयार करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत.

1. प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण ची लाभार्थी प्राधान्य क्रम यादी तयार करण्यासाठी आपणांस खालील प्रमाणे वेळा पत्रक निश्चीत करुन देण्यात येत आहे.

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी |
|---|---|---|
| | **ग्राम सभेपुर्वी करावयाची कार्यवाही ( पहिला टप्पा )** | |
| 1 | गट विकास अधिकारी,पंचायत समिती यांनी प्रथम तालुका स्तरीय समितीची स्थापना करुन या कार्यालयास अवगत करावे. तालूका स्तरीय समिती मध्ये 1. गट विकास अधिकारी,पंचायत समिती अध्यक्ष, 2. नायब तहसीलदार (तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेला) सदस्य 3. शाखा अभियंता (उप अभियंता यांनी वरिष्ठतम पैकी प्राधिकृत) सदस्य 4. विस्तार अधिकारी (सांख्यीकी)- सदस्य सचिव यांची नावे व फोन नंबर या कार्यालयास कळवावेत. | दि.08/08/2016 पर्यंत |
| 2 | गट विकास अधिकारी पंचायत समिती व तहसीलदार यांनी क्षेत्रीय अधिकारी (झोनल ऑफीसर) यांची ग्राम पंचायत निहाय नियुक्ती करावी. तसेच गावस्तरीय समितीची स्थापना करुन त्यामध्ये सरपंच,ग्राम सेवक, पोलीस पाटील,तलाठी,त्याठिकाणचा शाखा अभियंता व विस्तार अधिकारी इ. यांची नेमनूक करण्यात येवून संबंधीतांचे कार्यशाळेचे आयोजन करावे व तसे या कार्यालयास कळवावे. | दि.09/08/2016 पर्यंत |
| 3 | गाव स्तरावरील समितीने प्रथम तालूका स्तरावरुन देण्यात आलेली Auto Generated Priority List ग्राम सेवकाने प्रसिध्दी केली असल्याबाबतचा पंचनामा प्रत तालुका स्तरावरील समितीला देणे व तालूका स्तरावरील समितीने सदरील पंचनामा प्रत ग्राम पंचायत निहाय जिल्हा स्तरावरील समितीला देणे. | दि.09/08/2016 पर्यंत |
| 4 | गाव स्तरावरील समितीने Auto Generated Priority List मधील सर्व कुटूंबाची घर निकषा बाबतची ग्राम पंचायत निहाय नेमलेल्या/ गाव स्तरीय समितीने क्षेत्रीय अधिकारी, ग्राम सेवक,तलाठी,पोलीस पाटील,सरपंच व शाखा अभियंता किंवा स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांचे मार्फत संयुक्त पणे स्थळ पहाणी करणे व त्याचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात गट विकास अधिकारी,यांचे कडे | दि.14/08/2016 पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | दोन प्रतित सादर करावी व गट विकास अधिकारी यांनी एक प्रत जिल्हा स्तरीय समितीकडे सादर करावीत. सोबत प्रपत्र जोडले आहे.) | |
| 5 | ग्राम पंचायत निहाय ग्राम सभेचे आयोजन करणे व त्याठिकाणी ग्राम सभेस उपस्थित रहाणारे क्षेत्रीय अधिकारी यांचे नाव,पद, मोबाईल नंबर,ग्राम पंचायतचे नांव, ग्राम सभेचा दिनांक व वेळ संबंधीत ग्राम पंचायतचा ग्राम सेवक यांचे नांव व मोबाईल नंबर ग्राम पंचायत निहाय या कार्यालयास सादर करण्यात यावे. | दि.14/08/2016 |
| | **ग्राम सभेमध्ये करावयाची कार्यवाही ( दुसरा टप्पा )** | |
| 6 | उपरोक्त मुद्दा क्र. 4 मधील गाव स्तरावरील समितीने Auto Generated Priority List मधील सर्व कुटूंबाची घर निकषा बाबतची स्थळ पहाणीचा अहवाल ग्राम सभेपूढे ठेवणे. | ग्राम सभेच्या दिवशी |
| 7 | **विषेष ग्राम सभेचे आयोजन करणे :** संवर्ग निहाय Auto Generated Priority List ग्राम सभेपुढे ठेवणे व शासन पत्र दि.1/8/2016 मधील मुद्दा क्र. 5 मध्ये नमुद केल्या नुसार आवश्यक कार्यवाही करणे. (फक्त प्रपत्र अ,ब,क व ड बाबत सोबत जोडले आहे.) | ग्राम सभेच्या दिवशी |
| 8 | ग्राम सेवक व क्षेत्रीय अधिकारी, ग्राम सभेचे इतिवृत्त अंतिम करणे व गट विकास अधिकारी यांचे कडे सादर करणे :- या मध्ये मुद्दा क्र. 5 मधील अ,ब,क व ड मध्ये नमुद केल्या नुसार अनु.जा.,अनु.ज.,अल्पसंख्यांक व इतर संवर्ग निहाय प्राधान्य क्रम निश्चीत केलेल्या कुटूंबाची नावे ठरावातच नमुद करावीत. तसेच संवर्ग निहाय वेगळी व संगणकीय यादी सोबत जोडण्यात यावी. उपस्थिती पट देखील सोबत देण्यात यावी. | ग्राम सभेच्या दिवशी |
| 9 | प्रपत्र क बाबत ग्राम सेवकाने ग्राम सभेच्या ठरावामध्ये लाभ न देण्यासाठी नमूद करावयाची कारणे (उदा.यादीत चुकीने समाविष्ट,मयत पण वारस नाही,पक्के घर,शासकीय नौकरी,या पुर्वी लाभ मिळाला, कायम स्वरुपी स्थलांतरीत इ.) कारणे नमुद करावीत. | ग्राम सभेच्या दिवशी |
| | **ग्राम सभे नंतर करावयाची कार्यवाही ( तिसरा टप्पा )** | |
| 10 | प्रपत्र अ,ब,क व ड या विषयांवरील ग्राम सभेने ठरावाद्वारे मंजूर केलेल्या याद्यांना ग्राम सभा झालेल्या तारखेपासून 07 दिवस संबंधीत ग्राम पंचायत स्तरावर प्रसिध्दी द्यावी. | 15/08/2016 ते 21/8/2016 या कालावधीत जस जशा ग्राम सभा होतील त्या तारखे पासून पूढील 07 दिवस |
| 11 | प्रपत्र अ,ब व क च्या यादी संदर्भातील प्राधान्यक्रम बदल,वगळणे इ.संदर्भात हरकती असल्यास संबंधीत कुटूंबांनी यादी प्रसिध्दीची मुदत संपल्याच्या दिनांका पासून 15 दिवसाच्या आत संबंधीताने गट विकास अधिकारी,पंचायत समिती यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार दाखल करणे. | 22/08/2016 ते 06/09/2016 |
| 12 | तालुकास्तरीय समितीने ग्राम सभेकडून प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची छाननी / पडताळणी करुन त्या बाबतचा अहवाल 10 दिवसाच्या आत सोबत जोडलेल्या प्रपत्रात जिल्हा स्तरीय समितीकडे सादर करणे. | 07/09/2016 ते 16/09/2016 |
| 13 | प्रपत्र अ,ब व क या विषयावरील ठरावाच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारीवर तालुकास्तरीय समितीच्या चौकशी अहवाल व Auto Generated Priority List मधील सर्व कुटूंबांची घर निकषा बाबत तालुकास्तरीय समितीच्या चौकशी अहवालाच्या आधारे जिल्हा स्तर अपिलीय समितीने 10 दिवसाच्या आत अंतिम निर्णय देतील. | 17/09/2016 ते 26/09/2016 |
| | **चौथा टप्पा** | |
| 14 | जिल्हा स्तरीय समिती मार्फत ग्राम पंचायतीची संवर्ग निहाय अंतिम प्राधान्यक्रम यादी प्रसिध्द करावी, त्यानंतर ग्राम पंचायतीच्या सुचना फलकावर व प्रमुख ठिकाणी ग्राम पंचायतीची संवर्ग निहाय अंतिम प्राधान्य क्रम यादी प्रसिध्द करावी व त्याचा पंचनामा तालूका स्तरावर व जिल्हा स्तरावर सादर करावा. ग्राम पंचायत निहाय संवर्ग निहाय अंतिम प्राधान्य क्रम यादी गट विकास अधिकारी यांनी तालुका स्तरावरुन वेबसाईटवर अपलोड करावी. | अंतिम यादी प्रसिध्द झाल्या नंतर Aawas Soft वर अपलोड करणे 10 ऑक्टोंबर, 2016 पर्यंत |
| | **पाचवा टप्पा** | |
| **15** | Auto Generated Priority List मध्ये नसणा-या परंतु प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण साठी ग्राम सभेने विषय "ड"नुसार सुचविलेल्या नवीन लाभार्थींच्या याद्या तालुकास्तरीय समितीने छाननी/पडताळणी व | चौथा टप्पा पुर्ण झाल्यापासून 1 |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यकतेनुसार स्थळ पहाणी करुन जिल्हा स्तरीय समितीकडे अंतिम निर्णयासाठी सादर करणे. | महिन्याच्या मुदतीत |
| | **सहावा टप्पा** | |
| 16 | ग्राम सभेने न सुचविलेले लाभार्थी ग्राम सभा झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत तालुका स्तरीय समितीकडे अपिल सादर करु शकतील. तालुकास्तरीय समितीने छाननी/पडताळणी व आवश्यकतेनुसार स्थळ पहाणी करुन आपला अहवाल अभिप्रायासह 30 दिवसाच्या जिल्हा स्तरीय समितीकडे सोबत जोडलेल्या प्रपत्रात सादर केल्यानंतर पूढील 30 दिवसाच्या आत सदर अपीलावर जिल्हा स्तरीय समिती अंतिम निर्णय घेऊन संवर्ग निहाय यादी तयार करेल. | |

2. स्थळपहाणी करण्यासाठी ग्राम पंचायत निहाय खालील प्रमाणे समिती गठीत करावी.

- ग्राम सभा घेण्यासाठी गट विकास अधिकारी यांनी नेमलेले क्षेत्रीय अधिकारी — अध्यक्ष
- संबंधीत गावचे तलाठी — सदस्य
- संबंधीत ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक / ग्राम विकास अधिकारी — सदस्य सचिव
- संबंधीत ग्रामपंचायतीचे सरपंच — सदस्य
- संबंधीत गावचे पोलीस पाटील — सदस्य
- संबंधित पंचायत समितीचे शाखा अभियंता /कनिष्ठ अभियंता / स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक — सदस्य

**3.** वरिल समितीने आवश्यकते नुसार स्थळपाहणी करुन त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात गट विकास अधिकारी यांच्या कडे विहीत मुदतीत सादर करावयाचा आहे.

**4.** ज्या ग्राम पंचायतीमध्ये निवडणुक आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे अशा ग्राम पंचायतीया ठिकाणी विशेष ग्राम सभेचे आयोजन आचार संहिता संपल्यानंतर वरिल दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही अनूसरण्यात यावी.

**5.** संदर्भ क्र. 1 मध्ये दिलेल्या सुचनांचे काटेकोर पणे पालन करावे. तसेच या बाबत कोणतीही अनियमितता होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

सोबत :- प्रपत्र अ,ब,क,ड व स्थळ पहाणी अहवाल.

**6.** Auto Generated Priority List मध्ये एखाद्या कुटूंबाचा बोध होत नसेल तर SECC-2011 मधील ग्राम पंचायत स्तरावर देण्यात आलेल्या Data वरुन कुटूंबाचा बोध करुन घेण्यात यावा.

प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर

मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. तथा अध्यक्ष
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर

जिल्हाधिकारी,लातूर

प्रतिलिपी :- माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.

1. मा.प्रधान सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
2. मा.विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
3. उप सचिव (योजना), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई
4. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, सिडको भवन, 5 वा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई
5. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर
6. उप विभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, - - - - - - - - - - - - -
7. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद,लातूर
8. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),जिल्हा परिषद,लातूर

प्रपत्र -अ

**विषय -** ग्रामसभेने Generated Priority List मधील इतर सवंर्गातून अल्पसंख्याक संवर्गातील (जैन,बौध्द,ख्रिश्चन,शीख,पारशी, व मुस्लिम) कुटुंबांची यादी वेगळी करुन इतर व अल्पसंख्यांक संवर्गाची स्वतंत्र यादी मूळ प्राधान्यक्रम यादीतील प्राधान्यक्रम अबाधित ठेऊन तयार करणे.

ठराव क्रं. ---- ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने इतर संवर्गाची व अल्पसंख्याक संवर्गाची लाभार्थी निहाय यादी खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

सवंर्ग - इतर / अल्पसंख्याक

| अ.क्रं | जिल्हा / तालुक्याचे नांव | कुटुंब प्रमुख लाभार्थीचे नांव | Generated Priority प्रमाणे संवर्ग | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ग्रामसभेद्वारे शिफारस करणेत आलेला संवर्ग / प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(स्वाक्षरी)
सरपंच

(स्वाक्षरी)
ग्रामसेवक

(स्वाक्षरी)
विस्तार अधिकारी / ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी

प्रपत्र -ब

**विषय -** संवर्गनिहाय (अ.जा.,अ.ज,अल्पसंख्याक व इतर) प्राधान्यक्रम यादीमधून प्रधान मंत्री आवास योजना - ग्रामीण योजनेसाठी पात्र कुटूंबांची प्राधान्यक्रम यादी तयार करणे.

ठराव क्रं. ---- ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र कुटुंबाची / लाभार्थीची यादी खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

सवंर्ग - अ.जा/अ.ज/इतर/अल्पसंख्याक

| अ. क्रं | जिल्हा / तालुक्याचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | कुटुंब प्रमुख लाभार्थीचे नांव | Generated Priority प्रमाणे संवर्ग | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ देणेसाठी ग्रामसभेचा निर्णय (पात्र) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(स्वाक्षरी)
सरपंच

(स्वाक्षरी)
ग्रामसेवक

(स्वाक्षरी)
विस्तार अधिकारी / ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी

प्रपत्र -क

**विषय -** सवंर्गनिहाय (अ.जा.,अ.ज अल्पसंख्यांक व इतर) प्राधान्यक्रम यादीमधून अपात्र कुटुंबाची नावे वगळून व त्यांची कारणे नमूद करुन संवर्गनिहाय स्वतंत्र यादया तयार करणे.

ठराव क्रं. ---- ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संवर्गनिहाय अपात्र कुटूंबाची / लाभार्थी यादीसाठी खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

सवंर्ग - अ.जा/अ.ज/इतर/अल्पसंख्याक

| अ क्रं | जिल्हा / तालुक्याचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | कुटुंब प्रमुख लाभार्थीचे नांव | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ न देणेसाठी नमूद करावयाची कारणे (उदा.यादीत चूकीने समाविष्ट,मयत,पक्के घर,स्थलांतरीत इ.) |
|---|---|---|---|---|

(स्वाक्षरी) सरपंच

(स्वाक्षरी) ग्रामसेवक

(स्वाक्षरी) विस्तार अधिकारी / ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी

प्रपत्र - ड

**विषय** - Generated Priority List मध्ये समावेश नसलेल्या परंतु प्रधान मंत्री आवास योजना - ग्रामीण योजनेचा लाभ देण्यासाठी ग्रामसभेने सुचविलेल्या नविन कुटुंबाची संवर्गनिहाय (अ.जा.,अ.ज अल्पसंख्यांक व इतर) स्वतंत्र यादया कारणासहीत तयार करणे.

ठराव क्रं. ---- ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संवर्गनिहाय नविन नावे यादीमध्ये समाविष्ठ करणेसाठी सुचविणेत येत आहेत.

| अ. क्रं | जिल्हा / तालुक्याचे नांव | ग्रामपंचायतीचे नांव | कुटुंब प्रमुख लाभार्थीचे नांव | प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभ देणेसाठी समाविष्ठ करणेसाठीची कारणे |
|---|---|---|---|---|

(स्वाक्षरी) सरपंच

(स्वाक्षरी) ग्रामसेवक

(स्वाक्षरी) विस्तार अधिकारी / ग्रामसभेसाठी उपस्थित क्षेत्रीय अधिकारी

## प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत स्थळ पाहणी अहवाल

| मपंचायतीचे व | गावाचे नांव | स्थळ पहाणी चा दिंनाक | कुटुंब प्रमुखाचे नांव | सध्या राहत असलेल्या घराची स्थीती ( बेघर / 0 रुम/ 1 कच्ची खोली /2 कच्या खोल्या /2 पेक्षा जास्त कच्या खोल्या / पक्के घर) | कुटुंबाच्या नावे असलेली जमीन (2.5 एकर किंवा त्योपक्षा जास्त ओलिताची सुविधा असलेली शेत जमिन ( किमान एक ओलिताचे साधन असलेले) / एका वर्षात दोन किंवा त्यांपेक्षा अधिक पिके घेता येतिल अशी 5 एकर किंवा त्यापेक्षा जास्त ओलिता खालिल शेत जमिन / 7.5 एकर किंवा त्यापेक्षा जास्त शेत जमिन धारक कुटुंब ( किमान एक ओलिताचे साधन असलेले) | घरकुलाचा लाभ मिळण्यासाठी सदर कुटुंब पात्र आहे काय (होय /नाही) | पात्र नसल्यास त्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

मसेवक तलाठी सरपंच पोलीस पाटील कनिष्ठ अभियंता /स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक संपर्क अधिकारी